माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १६/२०२३**

**तक्रारकर्ता, श्री. केवल सुखदेव लभाने,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यकारी अभियंता,**
दक्षता पथक (नागपूर परिमंडळ) जलसंपदा विभाग, नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
दक्षता पथक (नागपूर परिमंडळ) जलसंपदा विभाग, नागपूर

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २०.११.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **अनुपस्थित** |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| २७.०६.२०२२ | --- | ११.०१.२०२३ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. १४६१/२०२० मध्ये दिनांक २७.०६.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २०.११.२०२३ रोजी ऑनलाईन सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यकारी अभियंता, दक्षता पथक ( नागपूर परिमंडळ) जलसंपदा विभाग नागपूर ऑनलाईन उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, दक्षता पथक (नागपूर परिमंडळ) जलसंपदा विभाग, नागपूर ऑनलाईन अनुपस्थित आहेत.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर * नागपूर *

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. १४६१/२०२० मध्ये दिनांक २७.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून " अपिलार्थी यांना माहिती प्राप्त होण्यासाठी विलंब झालेला असून त्यांना वारंवार कार्यालयात यावे लागले असून संबंधित अधिकाऱ्यांनी विहीत मुदतीत अपिलार्थीस माहिती प्राप्त झालेली दिसून येत नाही त्यामुळे अपिलार्थी हे विनामुल्य माहिती प्राप्त करण्यासाठी पात्र ठरतात. त्यानुसार अपिलार्थी यांनी रु. १०५०/- एवढे भरणा केलेले शुल्क त्यांना परत करावे. तसेच यापूढे माहिती अधिकार अर्जासंदर्भात कारवाई करण्यास विलंब होणार नाही व अपिलार्थीस नाहक त्रास होणार नाही याची सर्व सबंधितांनी दक्षता घ्यावी. सदर प्रकरणी जोडपत्र अ नुसार अपिलार्थीस उपलब्ध माहिती पुरविलेली असल्याने प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक १०.०१.२०२३ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. १४६१/२०२० मध्ये दिनांक २७.०६.२०२२ रोजी पारित आदेशानुषंगाने तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती प्रदान केली नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. जनमाहिती अधिकारी तथा सहा. अभियंता, श्रेणी-१, दक्षता पथक ( नागपूर परिमंडळ) जलसंपदा विभाग, नागपूर यांनी आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि. १७.११.२०२२ रोजी रु. १०५०/- इतकी रक्कम परत करण्यात आली असून त्याच दिवशी अनुपालन अहवाल आयोगास सादर केला. अपिलार्थी यांनी याच प्रकरणात दि. १०.०१.२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात माहिती दिली नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. अपिलार्थी यांना दि. १३.०२.२०२० रोजी ५२५ पृष्ठांची माहिती प्रदान केल्याचे आढळून येते. प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, दक्षता पथक (नागपूर परिमंडळ) जलसंपदा विभाग, नागपूर यांनी दि. २३.०३.२०२३ रोजी आयोगास अहवाल सादर केला. आयोगाने पारित केलेल्या दि. २७.०६.२०२२ रोजीच्या आदेशाचे पालन झाले असून प्रकरण नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक :** २०.११.२०२३

जा.क्र.-1565-दि.-----------
14 MAR 2024



E:\SS/ तक्रार २०.११.२०२३\१६-२०२३ लभाने १.docx